**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. :तंशिविकापु/संकीर्ण/एनजीसी/बातमी/आयआयटी मद्रास/२०२५/ 1506

दिनांक : 7 MAY 2025

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग

**विषय :** टाईम्स ऑफ इंडिया वर्तमान पत्रात प्रसिध्द बातमी दि. १०/०५/२०२४ वैयक्तिक देणगीदारांकडून विक्रमी देणगीबाबत ..

**संदर्भ :** १.शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.०५/तांशि-०४,दि. ६/३/२०२५
२. संचालनालयाचे पत्र क्र. २/ एनजीसी/बातमी/आयआयटी मद्रास/२०२५/

उपरोक्त विषयांस अनुसरून श्री अभय यावलकर, भा.प्र.से.(से.नि) राज्य सेवा हक्क आयुक्त नागपूर महसुल विभाग यांनी दि. २१/०१/२०२५ रोजी पाठविलेले पत्र शासनाकडून या संचालनालयांस प्राप्त झाले आहे. ( सोबत पत्र जोडले आहे. )

टाईम्स ऑफ इंडिया वर्तमान पत्रात दि. १०/०५/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली बातमी प्रमाणे आयआयटी मद्रासच्या माजी विद्यार्थी, उद्योग संस्था आणि वैयक्तिक देणगीदाराकडून विक्रमी देणगी मिळवल्यामुळे आयआयटी मद्रासच्या वाढत्या पायाभूत गरजा पुर्ण करण्यासाठी व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी त्याचा वापर होणार आहे.

महाराष्ट्रात सुध्दा आयआयटी मद्रास सारखी चळवळ प्रत्येक शाळा, कॉलेज मध्ये उभारणे गरजेचे आहे. सर्व शैक्षणिक संस्थानाही शाळा, कॉलेज वैद्यकीय महाविद्यालय व अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये या प्रकारे चळवळ उभारल्यास शाळेतील / संस्थेतील माजी विद्यार्थ्यांचा संस्थेशी एक वेगळेच ऋणानुबंधांचे नाते निर्माण होईल. संस्थेतील नोकरी व व्यवसायात असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून माजी विद्यार्थी संघ स्थापन केल्यास त्यांचद्वारे निधी प्राप्त करून विद्यार्थ्यांच्या अत्याधुनिक साहित्य व शैक्षणिक गरजा पुरविल्या जाऊ शकतात. आयआयटी मद्रास च्या धर्तीवर महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत व संस्थामध्ये माजी विद्यार्थी संघ तयार केल्यास संस्था स्वयंभू होण्यास हातभार लागून शासनावरील त्याची अंवलंबिता काही अंशी कमी होईल.

सोबत : संदर्भ क्र. १ मधील पत्र

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\परिपत्रक २०२४.docx

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्र.1967, मुंबई 400 001.

दूरध्वनीक्र.०२२-68597492/465/442/443/447

ई-मेल– desk2@dtemaharashtra.gov.inवेबसाइट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:2/एनजीसी/बातमी /आयआयटी-मद्रास/२०२5/

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर

विषय : टाईम्स ऑफ इंडिया वर्तमान पत्रात प्रसिध्द बातमी दि.१०.०५.२०२४ वैयक्तीक देणगीदाराकडून विक्रमी देणगीबाबत..

सदर्भ: शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२5/ प्र.क्र.०५ / तांशि-०४,दि.0६ .०3.२०२5

उपरोक्त संदर्भाधीन शासन पत्रान्वये श्री अभय यावलकर,भा.प्र.से(से.नि.),राज्य सेवा हक्क आयुक्त नागपूर महसुल विभागी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी पाठविलेले पत्र शासनाने या संचालनालयास पाठविले आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

टाईम्स ऑफ इंडिया वर्तमान पत्रात दि.१०.०५.२०२४ रोजी प्रसिध्द झालेली बातमी प्रमाणे IIT-मद्रासच्या माजी विद्यार्थी,उद्योग संस्था आणि वैयक्तीक देणगीदाराकडून विक्रमी देणगी मिळविल्यामुळे,IIT-मद्रासच्या वाढत्या पायाभुत गरजा पुर्ण करण्यासाठी व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी त्याचा वापर होणार आहे.

महाराष्ट्रात सुध्दा-IIT मद्रास सारखी चळवळ प्रत्येक शाळा कॉलेज मध्ये उभारणे गरजेचे आहे,सर्व शैक्षणिक संस्थानाही शाळा,कॉलेज वैद्यकीय महाविद्यालय व अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये या प्रकारे चळवळ उभारल्यास शाळेतील माजी विद्यार्थ्याचा संस्थेशी एक वेगळेच 'ऋणानुबंधाचे नाते निर्माण होईल.संस्थेतील नोकरी व व्यवसायात असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करुन माजी विद्यार्थी संघ स्थापन केल्यास त्यांच्याद्वारे निधी प्राप्त करुन विद्यार्थ्यांच्या अत्याधुनिक साहित्य व शैक्षणिक गरजा पुरविल्या जाऊ शकतात. IIT-मद्रास च्या धर्तीवर महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत व संस्थामध्ये माजी विद्यार्थी संघ तयार केल्यास संस्था स्वयंभू होण्यास हातभार लागुन शासनावरील त्याची अवलंबिता काही अंशी कमी होईल,हे लक्षात घेता आपल्या विभागातील सर्व संस्थांना याबाबतची माहिती आपल्या स्तरावरुन अवगत करुन देण्यात यावी.

( डॉ.सुनिल भामरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत: श्री अभय यावलकर,राज्य सेवा हक्क आयुक्त,नागपूर महसुली विभाग यांना माहितीसाठी.

( email द्वारे: crtsnagpur@maharashtra.gov.in)

E:\Admission 2025\R O.docx

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ३२.

Email ID: tashi४-hted@mah.gov.in

दूरध्वनी क्र.२२०४०९३५

क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.०५/तांशि-४ दिनांक : ६ मार्च ,२०२५

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- विविध व्यक्ती/संस्था यांच्याकडून शासनास प्राप्त झालेली पत्रे/निवेदने/अर्ज यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत.

महोदय,

विविध व्यक्ती/संस्था यांच्याकडून मा. मुख्यमंत्री महोदय /मा. मंत्री महोदय तसेच प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांना प्राप्त झालेले आपल्या कार्यालयाशी संबंधीत पत्रे/निवेदने/अर्ज सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. तरी, त्या अनुषंगाने प्रचलित नियम/आदेश/निर्णय/कायद्यांच्या अधिन राहून पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे, ही विनंती.

| अ. क्र. | ई-ऑफीस /संदर्भ क्र. | विषय व संबंधिताचे नाव/पत्र क्र. |
|---|---|---|
| १ | ४५ | विनंती शैक्षणिक देणगी/आर्थिक मदत /मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून माझ्या मुलाला अजय नंदकिशोर सोनी, विद्यार्थी,टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स,व्ही.एन, पुरव मार्ग देवनार डेपो समो, गोवंडी, मुंबई -८८ याचे पत्र दि.२५.०१.२०२५ |
| २ | ४६ | करोना -१९ या कालावधीत ज्या विद्यार्थीनींच्या पालकाचे निधन झाले त्यांना पदवी व पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक शुल्क माफ करणेबाबत. |

61
12.3.25

श्री देसाई

07 MAR 2025
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय

जा. क्र. तंशि. 302
दिनांक 10.03.2025

2190

| | | |
|---|---|---|
| ३ | ५० | विनंती शैक्षणिक देणगी/आर्थिक मदत /मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून माझा मुलाला अजय नंदकिशोर सोनी, विद्यार्थी,टाटा इन्स्टीट्युट ऑफ सोशल सायन्स,व्ही.एन, पुरव मार्ग देवनार डेपो समो, गोवंडी, मुंबई -८८ याचे पत्र दि.२५.०१.२०२५ |
| ४ | ७४ | शासनाकडील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम मिळणे बाबत श्री. ज्ञानेश्वर पुरुषोत्तम पाटील यांचे पत्र दि.१४.०१.२०२५ |
| ५ | ७३ | राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांची अंमलबजावणी प्रभावी पध्दतीने राबवणेबाबत. प्रशांत पोसले यांचे दि.१४.०२.२५ |
| ६ | ४८ | टाईम्स ऑफ इंडीया वर्तमान पत्रात प्रसिध्द बातमी दि.१०.०५.२०२४ वैयक्तीक देणगीदाराकडून विक्री देणगीबाबत श्री.अभय यावलकर यांचे दि.२१.०१.२०२५ |
| ७. | ८३ | Regarding No objection स्व. मधुकरराव देशमुख यांचे पत्र दि.२४.०२.२५ |
| ८ | ८८ | Subject Invitation to Collaborate-Admissions Open at Sant Sant Sant Shiromani Ravidas Global Skills Park (SSR-GSP), Bhopan याचे ईमेल |

सहपत्र : वरीलप्रमाणे

आपला,

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

अभय यावलकर
भा.प्र.से. (से.नि.)
राज्य सेवा हक्क आयुक्त
नागपूर महसुली विभाग
(मुख्य सचिव दर्जा)

सत्यमेव जयते

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 225
दि. 29/01/25

आपली सेवा
आमचे कर्तव्य

महाराष्ट्र शासन
राज्य सेवा हक्क आयोग
नागपूर विभाग, नागपूर
प्रशासकीय इमारत क्र. २, सिव्हिल लाईन्स
नागपूर ४४० ००१
ई-मेल : crtsnagpur@maharashtra.gov.in

अ.शा. पत्र क्र.विआका/सेहआ/संकीर्ण-का-(०१)/२९३/२५
दि. २१ जानेवारी, २०२५

विषय:- टाईम्स ऑफ इंडीया वर्तमान पत्रात प्रसिध्द बातमी दि. १०.०५.२०२४ वैयक्तीक देणगीदाराकडून विक्रमी देणगीबाबत.

प्रिय श्री. रेड्डीजी,

दिनांक १०.०५.२०२४ ची टाईम्स ऑफ इंडीया वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेली बातमी प्रमाणे, IIT-मद्रासच्या माजी विद्यार्थी, उद्योग संस्था आणि वैयक्तीक देणगीदाराकडून विक्रमी देणगी मिळविल्यामुळे, IIT- मद्रास च्या वाढत्या पायाभुत गरजा पुर्ण करण्यासाठी व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी त्याचा वापर होणार आहे.

मी रायगड जिल्हापरिषद चा मुख्य कार्यपालन अधिकारी असताना, जिल्हापरिषद व इतर सर्व शैक्षणिक संस्था मध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याकरीता, शाळांचा व्यवस्थापनास सुचना केल्या होत्या व त्याचा फायदा म्हणजे शाळा व्यवस्थापनास शाळेतीलच बहुसंख्य माजी विद्यार्थी यानी भरभरुन दिलेला प्रतिसाद व त्यामुळे विद्यार्थ्यांना नविन संसाधन उपलब्ध करुन देता आली.

J.S.(T.E.)

महाराष्ट्रात सुध्दा IIT-मद्रास सारखी चळवळ प्रत्येक शाळा कॉलेज मध्ये उभारणे गरजेचे आहे, सर्व शैक्षणिक संस्थानाही शाळा, कॉलेज, वैद्यकीय महाविद्यालय व अभियांत्रीकी महाविद्यालय मध्ये या प्रकारे चळवळ उभारल्यास शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा संस्थेशी एक वेगळेच रुणानुबंधाचे नाते निर्माण होईल. संस्थेतील नोकरी व व्यवसायात असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करुन माजी विद्यार्थी संघ स्थापन केल्यास त्यांच्याद्वारे निधी प्राप्त करुन विद्यार्थ्यांच्या अत्याधुनिक साहित्य व शैक्षणिक गरजा पुरविल्या जाऊ शकतात. IIT-मद्रास च्या धर्तीवर महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत व संस्थामध्ये माजी विद्यार्थी संघ तयार केल्यास शाळा स्वयंभू होण्यास हातभार लागुन शासनावरील

204
29/01/25

DTE

त्याची अवलंबीतता काही अंशी कमी होईल, हे लक्षात घेता त्या दृष्टीने कृपया आपले स्तरावर नियोजन झाल्यास महाराष्ट्रात IIT- मद्रास प्रमाणेच "ज्योतीने ज्योती" लावण्याच्या प्रकल्प निश्चित यशस्वी होईल यात शंका नाही

आपला

(अभय यावलकर)

प्रति,

श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी
अपर मुख्य सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२